जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

**प्रेस नोट दि.०९/१२/२०२४**

**दि.०८/१२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३८९/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०४(२) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३६ वर्षे, रा.लोहगांव,पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१२/२०२४ रोजी स.०७/१० ते ०७/२० वा.च्या दरम्यान अमृतेश्वर मंदिर,शनिवार पेठ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रनिंग करीत नमुद ठिकाणी आले असताना फिर्यादी यांचे पाठिमागुन टू-व्हीलर वरून आलेल्या नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीच्या गळयातील १,२०,०००/- रु.कि.ची सोन्याची चेन जबरदस्ताने खेचुन चोरी करुन निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार नाकाडे मो.नं.९७६४८३०१७६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४२२/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे,रा.चव्हाणनगर धनकवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०५/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना त्यांचे नावाने मुंबई ते तैवान असे पाठविलेल्या पार्सल मध्ये अंमली पदार्थ आढळल्याने त्याबाबत मुंबई नार्कोटिक्स येथे केस दाखल केल्याची भिती दाखवून त्यासंदर्भात चौकशी तसेच फिर्यादी यांना आरोपी करण्याची भिती दाखवून फिर्यादी यांचे कडुन २,६२,०००/- रु.ची आर्थिक फसवणूक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कापसे मो नं.९८२२५९९००८ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३६२/२०२४,भा.न्या.सं.कलम ३३१(३),(४),३०५ (अ) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५० वर्षे रा.लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१२/२०२४ रोजी रात्रौ ०२/०० वा. ते दि.०८/१२/२०२४ स.०८/०५ वा घरोंदा हाऊसिंग सोसायटी, बी.जे रोड,हॉटेल वुडलँडजवळ,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची आई ह्या नमुद ठिकाणाच्या राहते घराला कुलूप लावुन नातेवाईकांचे लग्नाला बाहेरगांवी गेल्या असता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने दरवाजाचा कोयंडा कशाचे तरी साह्याने तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटातील ४०,०००/- रु. रोख व सोन्याच्या वस्तु घरफोडी चोरी करुन नेल्या. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चव्हाण मो नं ७३५०७४३९०९ |

**प्रेस नोट दि.०९/१२/२०२४**

**दि.०९/१२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

१.

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४२४/२०२४,भा.न्या.सं.क ३२४(४)(५),सह आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो.अधि. कलम ३७(१)(२)(३) सह १३५, व क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५० वर्षे, रा. धनकवडी पुणे. |
| **आरोपीत** | दोन इसम व त्यांचा एक साथीदार(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१२/०२४ रोजी रात्री २०/४५ वा चे सुमा.सावरकर चौक, हिल टॉप सोसायटी रोडवर धनकवडी,पुणे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व त्यांचा एक साथीदार हे नमुद ठिकाणी आरडा-ओरडा करत हातातील लोंखडी हत्यार हवेत फिरवुन आम्ही इथले भाई आहोत, असे म्हणुन लोंकाचे मनात दहशत निर्माण करून नमुद इसम हे कोणाचा तरी शोध घेत असताना तो इसम मिळून न आल्याने त्यांनी त्यांचे कडील लोंखडी हत्याराने रस्त्याचे कडेला उभी असलेल्या दोन रिक्षा व एक कार यांच्या काचा फोडून नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार जाधव मो नं.९७६५२६०१०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**